**महाराष्ट्र शासन**
**पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग**
**शासन निर्णय क्रमांक : टिडीएस २०२१/०२/प्र.क्र.५०१/पर्यटन,**
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२,
दिनांक : १५ मार्च, २०२१

**संदर्भ:** पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग, शासन निर्णय क्रमांक टिडीएस २०१५/०१/प्र.क्र.१०२१/ पर्यटन, दि.०४/०५/२०१६

**प्रस्तावना :-**

पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग शासन निर्णय, दि.४/५/२०१६ अन्वये 'महाराष्ट्र पर्यटन धोरण- २०१६' घोषित करण्यात आले आहे. सदर धोरणामधील परिच्छेद ४.६ मध्ये 'कॅरॅव्हॅन पर्यटन' चा समावेश करण्यात आला आहे. त्यानुसार (१) सार्वजनिक क्षेत्र, खाजगी क्षेत्र आणि पीपीपी तत्वावरील कॅरॅव्हॅन पार्कस् व (२) सार्वजनिक क्षेत्र, खाजगी क्षेत्र आणि पीपीपी तत्वावरील कॅरॅव्हॅन या उपक्रमांच्या विकासाला चालना देणे, सुलभीकरण करणे आणि प्रोत्साहनपर लाभ देणे यासाठी पर्यटन खाते एक धोरण तयार करेल, अशी तरतूद करण्यात आली आहे. याशिवाय, कॅरॅव्हॅन पार्कसच्या प्रवर्तनासाठी, चालविण्यासाठी आवश्यक बाबी सुरक्षा आणि सुरक्षितताविषयक उपाययोजना, स्थळ विकास कार्यपध्दती, आवश्यक त्या सेवांसह पार्किंग बेज उभारणे, स्वच्छतागृह सुविधा आरोग्यविषयक जबाबदारीचे निकष आणि पर्यावरणपोषक कार्यपध्दती याविषयी मार्गदर्शक तत्वे आणि निकष तयार करण्याची कार्यपध्दती पर्यटन विभागामार्फत तयार करण्यात येईल, अशी तरतूदही महाराष्ट्र पर्यटन धोरण -२०१६ मध्ये करण्यात आली आहे.

२. उपरोक्त तरतूदी विचारात घेता व कोविड-१९ च्या पार्श्वभूमीवर सुरक्षित पयर्टनाच्या दृष्टीने पर्यटक खाजगी वाहनाने प्रवासास प्राधान्य देत आहेत हे पाहता, कॅरॅव्हॅन व कॅरॅव्हॅन पार्क या सुविधा पर्यटकांना उपलब्ध करुन देण्यासाठी कॅरॅव्हॅन पर्यटन धोरण जाहीर करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-**

महाराष्ट्रात निसर्गरम्य समुद्र किनारे, ऐतिहासिक किल्ले, पर्वतरांगा, थंड हवेची ठिकाणे, नदी, वनसंपदा, ऐतिहासिक वारसास्थळे, लेणी, धरणे अशी अनेक वैशिष्ट्यपूर्ण पर्यटनाची ठिकाणे आहेत. अशा ठिकाणी कॅरॅव्हॅन पर्यटनाकरिता मोठा वाव आहे. अतिदुर्गम भागात हॉटेल, रिसॉर्ट सारख्या राहण्याच्या सोयी अत्यंत कमी प्रमाणात उपलब्ध आहेत. अशा ठिकाणी तसेच ज्या क्षेत्रामध्ये कायमस्वरुपी बांधकामासाठी प्रतिबंध घालण्यात आले आहेत अशा ठिकाणी कॅरॅव्हॅन व कॅम्परव्हॅनच्या साहाय्याने पर्यटकांना सर्व सोयी सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी एक

सुनियोजीत व्यवस्था निर्माण करुन पर्यटन विकास साध्य करण्यासाठी राज्यात कॅरॅव्हॅन पर्यटन धोरण राबविण्यास मान्यता देण्यात येत आहे.

**<u>धोरणाची उद्दिष्टे :</u>**

१. पर्यटन धोरण -२०१६ अंतर्गत कॅरॅव्हॅन पर्यटन संकल्पनेची प्रत्यक्षात अंमलबजावणी करणेसाठी मार्गदर्शक सुचना व निकष विहित करणे.
२. वैशिष्ट्यपूर्ण पर्यटनस्थळी पर्यटकांना राहण्याची सुविधा उपलब्ध करुन देणे.
३. खाजगी गुंतवणूकीस प्रोत्साहन देऊन पर्यटकांना सुविधा उपलब्ध करुन देणे.
४. कौटुंबिक सहलींच्या आयोजनासाठी प्रोत्साहन देणे.
५. निसर्ग जवळून अनुभवण्याची संधी असलेल्या ठिकाणी पर्यटकांना राहण्याची सुविधा उपलब्ध करुन देणे.
६. हॉटेल, रिसॉर्ट या पारंपारिक निवास व्यवस्थेपेक्षा नाविन्यपूर्ण अनुभव पर्यटकांना उपलब्ध करुन देणे.
७. नवीन पर्यटन स्थळांचा शोध व दुर्गम स्थळी पर्यटकांना राहण्याची सुविधा देऊन तेथील पर्यटनाचा विकास व स्थानिक अर्थव्यवस्थेला चालना देणे.
८. "ना विकास क्षेत्राचा" व्यावसायिक गतिविधी करिता वापर करण्यास संधी.
९. कमी गुंतवणूक जास्त आर्थिक लाभ.
१०. दुर्गम भागातील पर्यटनाला चालना देणे.
११. रोजगाराची संधी उपलब्ध करुन देणे.
१२. ज्या ठिकाणी निवासाची सोय नाही त्या ठिकाणी निवास व्यवस्था उपलब्ध करुन देणे.

**<u>धोरणाची व्याप्ती</u>**

राज्यात विपुल प्रमाणात उपलब्ध असलेल्या संसाधनांचा उत्तमरित्या वापर करुन कॅरॅव्हॅन व कॅरॅव्हॅन पार्क या सुविधा पर्यटकांना उपलब्ध करुन देण्यासाठी हे धोरण तयार करण्यात आले आहे. हे धोरण संपूर्ण महाराष्ट्र राज्याला लागू राहील.

**<u>भाग-१ कॅरॅव्हॅन पार्क</u>**

१. **<u>संकल्पना व संज्ञा :</u>**

अ) "कॅरॅव्हॅन पार्क" - "मूलभुत सोयी सुविधांनी युक्त अशी जागा जेथे कॅरॅव्हॅन करिता निश्चित केलेल्या ठिकाणी कॅरॅव्हॅन उभी करुन मुक्काम करता येतो, अशा पार्कमध्ये लहान मोठ्या आकाराच्या कॅरॅव्हॅन उभी करण्याची व्यवस्था असते."

आ) "हायब्रीड कॅरॅव्हॅन पार्क" - "यामध्ये एकाच ले आऊटमध्ये एका भागात कॅरॅव्हॅन पार्क व उर्वरित जागेत रिसॉर्ट, मनोरंजन उद्यान, साहसी उपक्रम, वॉटर पार्क, तंबूची कँपींग साईट, निसर्ग उद्यान, कृषी पर्यटन यांसारखे एक किंवा अनेक उपक्रम असतील."

**२. <u>कॅरॅव्हॅन पार्क करिता जमीन:</u>**

१. कॅरॅव्हॅन पार्क खाजगी /शासकीय जमिनीवर स्वत: जमीन मालक अथवा विकासक उभारु शकतील.
२. जास्तीत जास्त २० पार्किंग बे करिता कमीत कमी १ हेक्टर जमीन आवश्यक आहे.
३. वेगवेगळ्या आकाराच्या कॅरॅव्हॅन थांबू शकतील अशी कॅरॅव्हॅन पार्कची रचना असणे आवश्यक आहे.
४. कॅरॅव्हॅन पार्ककरिता जमीन सपाट (टेबल लँड) असणे आवश्यक आहे.
५. कॅरॅव्हॅन पार्क प्रामुख्याने खालीलपैकी एका ठिकाणी असावे:-

I. जंगलाचा बफर झोन.
II. किल्ल्यांचा पायथा.
III. हिल स्टेशन.
IV. धरण परिसर.
V. गुहा परिसर.
VI. समुद्र किनाऱ्यालगतचा परिसर
VII. महामार्गालगतचा परिसर

६. या व्यतिरिक्त महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाच्या परिसरात किंवा महामंडळाच्या ताब्यातील मोकळया जमिनीवर महामंडळास स्वत: किंवा खाजगी उद्योजकांसोबत भाडेकरार करुन कॅरॅव्हॅन पार्क उभारता येतील.

**३. <u>कॅरॅव्हॅन पार्कची जागा व पार्कचा आराखडा:</u>**

१. कॅरॅव्हॅन पार्कची जागा व त्याकरिताचा आराखडा सभोवतालच्या परिसराशी व सर्व प्रकारच्या हवामानाशी सुसंगत असणे आवश्यक आहे.
२. कॅरॅव्हॅन पार्किंग करताना रहदारीचा प्रश्न येऊ शकतो. त्यामुळे कॅरॅव्हॅन फिरविणे/ वळविणेसाठी पुरेशी जागा उपलब्ध असली पाहीजे, अशा रीतीने कॅरॅव्हॅन पार्कची रचना केलेली असावी.
३. पर्यावरण अनुकूल सांडपाणी व्यवस्था, रेन वॉटर हार्वेस्टिंग व्यवस्था असणे आवश्यक आहे.
४. कॅरॅव्हॅन पार्कचा ले आऊट सर्व प्रकारच्या व्यावसायिक गरजा पुर्ण होऊ शकतील असा असावा.

५. कॅरॅव्हॅन पार्कचे प्लॅनिंग करताना पर्यटकांचे खाजगीपण जपणे व सुरक्षितता विचारात घेऊन करावे.

**४. अंतर्गत रस्ते:**

१. कॅरॅव्हॅन पार्कशी सुसंगत, योग्य त्या रुंदीचे व पर्जन्यजलाचा योग्य प्रकारे निचरा होईल असे अंतर्गत रस्ते असावेत.

**५. वाहनतळ व्यवस्था:**

वाहनतळाच्या ठिकाणी खालील सुविधा असणे आवश्यक आहे.

१. एक तरी पार्किंग बे हे १५ मी. — ६ मी. (डोंगराळ व उंचीच्या ठिकाणी) व बाकीचे ७.५मी.— ५मी. चे असावे.
२. थांब्याच्या ठिकाणी दोन कॅरॅव्हॅनमध्ये कमीत कमी ५ मीटरचे अंतर असावे.
३. प्रत्येक पार्किंग बे स्वतंत्ररित्या सिमांकित केलेले असावे व ते थेट अंतर्गत रस्त्याला जोडलेले असावे.
४. पार्किंग बे चे बांधकाम पक्के व जमीनीपासुन किमान ६ इंच उंच असावे.
५. प्रत्येक पार्किंग बे ला स्वतंत्र पाणी व वीज जोडणी असावी.

**६. पर्यटक सुविधा केंद्र:**

१. पर्यटक सुविधा केंद्राचे बांधकाम पर्यावरणपूरक साधनांनी केलेले असावे. पर्यटन सुविधा केंद्र केवळ तळ मजल्यावरच स्थित असावे तसेच शक्यतो जमीनीपासुन जास्त उंचीवर नसावे.
२. पर्यटक सुविधा केंद्रातील कर्मचारी वर्ग प्रशिक्षित असावा. कर्मचाऱ्यांकरिता ड्रेस कोड असावा.
३. “काय करावे, काय करु नये” याची यादी दर्शनी भागात लावण्यात यावी.
४. किमान एक इलेक्ट्रीशियन, प्लंबर व सफाई कामगार यांची सेवा उपलब्ध असावी.
५. स्थानिक नकाशे / ब्राऊशर पर्यटकांसाठी उपलब्ध असावेत.
६. स्थानिक पर्यटक मार्गदर्शक (गाईड), टॅक्सी, रिक्षाचालक सोबत टायअप करण्यात यावे.
७. वेटिंग रुम, रेस्ट रुमची सुविधा असावी.
८. टिकाऊपणा, ऊर्जा कार्यक्षमता आणि स्थानिक सामग्रीच्या वापरासह आर्किटेक्चरला प्राधान्य असावे.

**७. लँडस्केपिंग:**

१. लँडस्केपींग व गार्डन असावे. पर्यटकांची सुरक्षा, एकांत यांचा विचार करुन लँडस्केपिंग व रोडच्या बाजुला स्थानिक व देशी वृक्षांची लागवड करणे गरजेचे आहे.

२. एकुण जागेच्या किमान १०% जागा किंवा स्थानिक नगररचना विभागाच्या नियमाप्रमाणे आवश्यक तेवढी मोकळी जागा मनोरंजनासाठी असणे आवश्यक आहे.
३. धूळ, वारा यांचा त्रास होणार नाही अशा पद्धतीचे लँडस्केपिंग असणे आवश्यक आहे.

**८. <u>कॅरॅव्हॅन पार्क परिचालनाकरिता आवश्यक / बंधनकारक बाबी.</u>**

१. पर्यटन हंगामात कॅरॅव्हॅन पार्क २४— ७ सुरू असावे.

२. मुख्य रस्त्यापासून कॅरॅव्हॅन पार्क कडे जाणारा पोहोच रस्ता सुस्थितीत असावा.

३. पिण्याच्या पाण्याची व वापराच्या पाण्याची पुरेशी सोय असावी.

४. पुरेसा वीज पुरवठा असावा, वीज पुरवठा खंडीत झाल्यास बॅकअपची सूविधा असावी.

**९. <u>सुरक्षितता (Safety & Security)</u>**

कॅरॅव्हॅन पार्क मालकांनी पर्यटकांच्या सुरक्षेच्या दृष्टीने खालील अनिवार्य बाबींची पुर्तता करणे आवश्यक आहे.

१. अनधिकृत प्रवेश टाळण्यासाठी कॅरॅव्हॅन पार्क चारही बाजूंनी कुंपणाने सुरक्षित असावे तसेच पुरेशी सुरक्षा उपाययोजना जसे की, सुरक्षा रक्षक, सीसीटीव्ही असणे आवश्यक आहे.
२. अग्निशमन यंत्र असावे.
३. प्रथमोपचार साहित्य तसेच प्रथमोपचारांबाबत प्रशिक्षित कर्मचारी वर्ग असणे आवश्यक आहे.
४. “डॉक्टर ऑन कॉल” ची सुविधा कॅरॅव्हॅन पार्क मध्ये असणे आवश्यक आहे.
५. कॅरॅव्हॅन पार्क मालकांनी स्थानिक वैद्यकीय अधिकाऱ्यांशी संपर्क ठेवणे आवश्यक आहे.
६. आग, अपघात, भुकंप, पूर यासारख्या आपत्तींचा सामना करण्यासाठी कॅरॅव्हॅन पार्कमधील कर्मचाऱ्यांना आपत्ती व्यवस्थापनाचे प्रशिक्षण देणे अनिवार्य आहे.
७. सुरक्षेची जबाबदारी सहल आयोजक व कॅरॅव्हॅन पार्क चालक यांची संयुक्त जबाबदारी असेल.
८. कॅरॅव्हॅन पार्कची प्रवेशद्वार संख्या (Entry Points) मर्यादित असावी जेणेकरुन पार्कच्या जागेत कोणी अवैधरित्या प्रवेश करु शकणार नाही.
९. नैसर्गिक आपत्ती व तातडीच्या वैद्यकीय सेवा याबाबतची परिस्थिती हाताळण्याची कार्यपद्धती (Standard Operation Procedure) कॅरॅव्हॅन पार्कच्या व्यवस्थापनाने विहित केलेली असावी.

**१०. स्वच्छता:**

१. २४ तास पाण्याच्या सुविधेसह पुरुष व महिलांकरिता वॉश बेसिन, आरसा इत्यादी सर्व सुविधांयुक्त स्वतंत्र स्वच्छतागृहांची पुरेशी सोय असावी.

२. वाहन चालकांसाठी स्वतंत्र स्वच्छतागृह असावे.

३. कॅरॅव्हॅन पार्कमध्ये पार्किंग बे च्या संख्येच्या प्रमाणात स्वच्छतागृहे असावीत.

४. स्वच्छतागृहामध्ये पर्यावरण पुरक सुविधा (Eco Toilets) असल्या पाहिजेत.

५. टाकाऊ पदार्थांचा पुर्नवापर करुन पर्यावरणाच्या दृष्टीने योग्य तो वापर केला पाहिजे.

६. स्वच्छतागृहांची दिवसातुन कमीत कमी २ वेळा स्वच्छता करण्यात यावी.

७. कोणत्याही स्वरूपाचा कचरा जाळणे किंवा त्याची विल्हेवाट लावणे अनुज्ञेय नाही. कचरा व्यवस्थापन स्थानिक ग्रामपंचात व प्राधिकरणे यांनी त्यांचे स्तरावर करावे.

८. विघटनशील व अविघटनशील कचऱ्याकरिता स्वतंत्र कचरापेट्या ठेवणे अनिवार्य असेल.

९. “धुम्रपान निषेध व थुंकू नये,” “स्वच्छ परिसर व प्लॅस्टीकमुक्त ठेवणे” यांसारखे संदेश दर्शविणारे फलक दर्शनी भागात लावणे.

**११. विकलांगांकरिता तरतुद:**

- कॅरॅव्हॅन पार्कमध्ये व्हिलचेअर असणे आवश्यक आहे तसेच विकलांग व्यक्तींना सहजरित्या फिरता यावे, अशी कॅरॅव्हॅन पार्कची रचना असावी.
- विकलांगांकरिता स्वतंत्र स्वच्छतागृहाची व्यवस्था असावी.

**१२. वैकल्पिक बाबी :-**

१. लॉंड्रीची व्यवस्था, गाईडची सुविधा, अभ्यागतांसाठी वेटींग लाऊंज, वाहन चालकांसाठी राहण्याची स्वतंत्र व्यवस्था असावी.

२. कॅरॅव्हॅन पार्क चालकांनी पर्यटकांना सुरक्षित, जबाबदार व अनुभवजन्य पर्यटन सुविधा देण्याचा प्रयत्न करावा. आसपासच्या पर्यटन स्थळांची माहिती उपलब्ध असावी.

३. पिकनिक टेबल, लहान मुलांच्या खेळण्याचे व मनोरंजनाचे साहित्य उपलब्ध असावे.

४. राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या मान्यतेने कॅरॅव्हॅन पार्कमध्ये बारची सोय करता येईल.

५. पर्यटक सुविधा केंद्राच्या ठिकाणी वाहनांच्या दुरूस्तीचे साहित्य, प्रथमोपचार सुविधा असावे.

**१३. आवश्यक परवानग्या**

१. कॅरॅव्हॅन पार्कसाठी नियोजन प्राधिकरण / स्थानिक प्राधिकरणांच्या विकास नियंत्रण नियमावली नुसार ले- आउट तसेच बांधकाम परवानगी.

२. पोलिसांचे ना हरकत प्रमाणपत्र (N.O.C)

३. महसूल विभाग, वन विभाग, जलसंपदा विभाग, महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाच्या जागेवर प्रकल्प असल्यास त्या बाबत संबंधित विभागाशी केलेले करारपत्र.

४. पर्यटन संचालनालय, वन विभाग, जलसंपदा विभाग, महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ या विभागांच्या कॅरॅव्हॅन पार्कसाठी आवश्यक परवानग्या घ्याव्या लागतील.

५. आवश्यकतेप्रमाणे पर्यावरण विभागाची परवानगी / ना हरकत प्रमाणपत्र.

**भाग-२ कॅरॅव्हॅन**

**१. संकल्पना व संज्ञा**

अ) **"कॅरॅव्हॅन"** - "बेडची सुविधा असलेले व किचन, टॉयलेट, सोफा, टेबल यांसारख्या वैकल्पिक सुविधा असलेले वाहन होय".

"प्रवास, विश्रांती व निवासाच्या उद्देशाने वैशिष्ट्यपुर्ण बांधणी करण्यात आलेले वाहन म्हणजे कॅरॅव्हॅन, यामध्ये Recreational Vehicles, कॅम्परव्हॅन, मोटार होमचा समावेश होतो."

ब) **कॅरॅव्हॅन ऑपरेटर :-** पर्यटकांना भाड्याने कॅरॅव्हॅन उपलब्ध करुन देण्याचा व्यवसाय करणारा उद्योजक / व्यावसायिक म्हणजेच कॅरॅव्हॅन ऑपरेटर.

**२. कॅरॅव्हॅनचे प्रकार**

१,२, ३ या सर्व प्रकारच्या कॅरॅव्हॅनसाठी हे धोरण लागु राहील.

१) **सिंगल एक्सेल कन्व्हेंशल कॅरॅव्हॅन** :- ३ मीटर X ६.५ मीटर लांबीच्या २ - ६ व्यक्ती झोपु शकणारे कॅरॅव्हॅन. यामध्ये बेड, खुर्ची, टेबल, स्वच्छतागृह, स्नानगृह व स्वयंपाकाची सुविधा असते.

२) **द्विन एक्सल कॅरॅव्हॅन** :- मोठ्या कॅरॅव्हॅनला अतिरिक्त एक एक्सल बसविले जाऊ शकते. यामुळे मोठ्या लक्झरी कॅरॅव्हॅनला स्थिरता मिळु शकते. जास्त लांबीच्या कॅरॅव्हॅनमुळे अतिरिक्त जागा उपलब्ध होऊन जास्तीच्या सुविधा निर्माण करता येवु शकतात.

३) **टेन्ट ट्रेलर**:- टेन्ट ट्रेलर कारच्या मदतीने एका ठिकाणावरुन दुसऱ्या ठिकाणी घेऊन जाता येते. टेन्ट ट्रेलर वेगवेगळ्या लांबीच्या व विविध साधनांनी युक्त असुन ते सहजपणे घडी घालुन नेता येते.

४) **फोल्डिंग कॅरॅव्हॅन** : - जागेची समस्या असेल तर फोल्डिंग कॅराव्हॅनचा वापर सहजपणे करता येतो.

५) **कॅम्पर ट्रेलर**:- कॅम्पर ट्रेलर हे टेन्ट ट्रेलर सारखेच असतात. कॅम्पर टेलरमध्ये अतिरिक्त टेन्ट बर्थची सोय असते. टेन्ट ट्रेलर प्रमाणे सर्व सुविधा कॅपर ट्रेलर मध्ये असतात.

### ३. कॅरॅव्हॅन / कॅपरव्हॅन संबंधी बंधनकारक सूचना

१. आयुक्त, परिवहन विभाग यांचेकडे आवश्यक ते शुल्क भरुन (कॅरॅव्हॅन) वाहनांची नोंदणी करावी.
२. कोणत्याही परिस्थितीत कॅरॅव्हॅन ही किल्ले, प्रतिबंधित असलेली वने, धरणे यांच्या क्षेत्रांमध्ये तसेच नदीच्या पुर रेषेच्या आत नेण्यास मनाई असेल.
३. नैसर्गिक पाण्याच्या स्त्रोतांमध्ये किंवा उघड्यावरील जमीनीवर कॅरॅव्हॅनमधील मलनिसारण थेट केले जाणार नाही याची दक्षता कॅरॅव्हॅन मालकांनी घ्यावी.

### कॅरॅव्हॅन / कॅम्परव्हॅनमध्ये अनिवार्य मुलभुत सुविधा.

१. सोफा कम बेड (किमान २ व्यक्तींकरीता) झोपण्याची व्यवस्था असावी.
२. थंडपेय व स्नॅक्सची सुविधा
३. वातानुकूलित यंत्रणा. (Air Coditioning)
४. बाह्य बार्बेक्यू पॉईंटस.
५. टो-टोच स्टेबिलायझर्स
६. मोबाईल चार्जिंग सुविधा.
७. जीपीएस प्रणाली.
८. बॅटरी किंवा बाह्य हूक अप द्वारे वीज पुरवठा करण्याची सुविधा.
९. गॅस / वीजेवर चालणारे वॉटर हीटर.
१०. कॅरॅव्हॅन पार्क करण्यासाठी पॉवर व्हील मूवर सिस्टम (Integrated or clip-on)
११. मोठ्या कॅरॅव्हॅनमध्ये वाहन चालक व प्रवासी यांच्यात संवादाकरिता स्वतंत्र व्यवस्था

### ४. वैकल्पिक बाबी

१. वॉशिंग मशीन व क्लॉथ ड्रायर.

२. कॅरॅव्हॅनच्या मागे सायकल ठेवणेसाठी सुविधा.
३. तंबुचे साहित्य
४. ऑडिओ गाईडची सुविधा.
५. फ्रिज, मायक्रोव्हेव सह पाकगृह.
६. स्वच्छतागृह पुरेशा पाण्यासह शॉवर व हँड शॉवरची सुविधा.
७. खाण्याचे टेबल (Dining Table).
८. ग्रे वॉटर (वॉशवॉटर) आणि ब्लॅक वॉटर (सीवेज) साठी वेगळ्या सांडपाण्याच्या टाक्या.
९. दिव्यांग व्यक्तींकरीता व्हिल चेअरची सुविधा देण्यात यावी.

**५. सर्वसाधारण सुचना.**

१. कॅरॅव्हॅन ही नोंदणीकृत कॅरॅव्हॅन पार्क मध्ये ज्या विभागांनी वाहन पार्किंगसाठी परवानगी दिली आहे, अशाच ठिकाणी मुक्कामासाठी उभी करता येईल.
२. कॅरॅव्हॅन ऑपरेटरांना पंढरपुर वारी, नाशिक कुंभमेळा व महाराष्ट्रातील मोठ्या यात्रांच्या ठिकाणी परिचालन करण्याकरीता प्राधान्याने सदर यात्रा कालावधी दरम्यान जागेच्या उपलब्धतेनुसार जागा मालकाच्या संमतीने कॅरॅव्हॅन उभे करता येईल. कॅरॅव्हॅन पार्कच्या ठिकाणीच कॅरॅव्हॅन उभी करण्याची अट याकरिता शिथिल समजण्यात यावी.
३. जर कॅरॅव्हॅन पर्यटक स्वत: चालवित नेणार असतील तर त्या पर्यटकास सेल्फ ड्राईव्हचा अनुभव असावा.
४. अद्ययावत भारतीय वाहन मानकांनुसार वाहन असावे.
५. कॅरॅव्हॅन ऑपरेटरने ऑनलाईन बुकिंगची सुविधा द्यावी.
६. परिवहन विभाग व वाहतूक विभागाचे नियम पाळणे बंधनकारक राहिल.
७. अपघात झाल्यास नजीकच्या पोलिस ठाणे, हॉस्पिटलला कळविणे वाहनचालक / कॅरॅव्हॅन ऑपरेटर वर बंधनकारक असेल.

**भाग - ३**

**१. इतर सर्वसाधारण बाबी:**

१. कॅरॅव्हॅन, कॅरॅव्हॅन चालक, कॅरॅव्हॅन पार्क या बाबींचा Third Party Insurance असावा.
२. महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळास त्यांचे पर्यटक निवासाच्या परिसरामध्ये किंवा महामंडळाच्या ताब्यातील मोकळया जमिनीवर कॅरॅव्हॅन पार्किंग करता येईल
३. खाजगी उद्योजकांना महामंडळाशी भाडे करार करुन कॅरॅव्हॅन पार्किंग करता येईल.
४. पर्यटन संचालनालयाकडे नोंदणीकृत कृषी पर्यटन केंद्रांच्या ठिकाणी जास्तीत जास्त ५ कॅरॅव्हॅन वाहन पार्क करता येतील.

## २. <u>पर्यटन घटकांना शासनाकडून मिळणारे लाभ</u>

१. पर्यटन धोरण - २०१६ अंतर्गत कॅरॅव्हॅन पार्क / कॅरॅव्हॅन पर्यटनाकरिता उपलब्ध प्रोत्साहने जसे की, मुद्रांक शुल्कामध्ये सुट, राज्य वस्तु व सेवा कराचा परतावा, विद्युत शुल्कामध्ये सुट लागू राहील.
२. पर्यटन धोरण - २०१६ अंतर्गत कॅरॅव्हॅनसाठी बँकेकडुन कर्जपुरवठा होणेसाठी पर्यटन संचालनालयाचे ना -हरकत प्रमाणपत्र दिले जाईल.
३. कॅरॅव्हॅन पार्किंग जागांकरिता पर्यटन संचालनालय सुलभीकरण प्रयत्न (Facilitation) करेल.
४. कॅरॅव्हॅन मालक महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाच्या जागांवर कॅरॅव्हॅन पार्किंग करिता स्वतंत्ररित्या महामंडळाबरोबर करार करु शकतील.
५. कॅरॅव्हॅन पार्किंग जागांकरिता पर्यटन संचालनालयाच्या ना-हरकत प्रमाणपत्रामुळे इतर विभागांच्या आवश्यक परवानग्या मिळणे सुलभ होईल.
६. पर्यटन घटक म्हणून नोंदणी केलेल्या कॅरॅव्हॅन्सना वाहन करातून संपूर्ण सूट देण्यासंदर्भात परिवहन विभागामार्फत स्वतंत्र आदेश निर्गमित करण्यात येतील.

## ३. <u>नोंदणी</u>.

१. कॅरॅव्हॅन, कॅरॅव्हॅन पार्क व हायब्रीड कॅरॅव्हॅन पार्कची नोंदणी पर्यटन संचालनालयाकडे आवश्यक राहील.
२. कॅरॅव्हॅन पार्क व कॅरॅव्हॅन टुर ऑपरेटर यांची नोंदणी ऑनलाईन पद्धतीने पर्यटन विभागामार्फत करण्यात येईल. महाराष्ट्र टुरिझमच्या www.maharashtratourism.gov.in या संकेतस्थळावर ही सुविधा असेल.
३. नोंदणी शुल्क रुपये पाच हजार व नुतनीकरणासाठी रुपये दोन हजार शुल्क असेल.
४. दर पाच वर्षांनी नुतनीकरण करण्यात येईल.
५. वैयक्तिक, खाजगी वापराकरिता असलेल्या कॅरॅव्हॅनसाठी या धोरणांतर्गत कोणतेही लाभ अनुज्ञेय नसल्याने त्यांच्या वाहनाची नोंदणी पर्यटन संचालनालयाकडे करण्याची आवश्यकता नाही.
६. संचालक, पर्यटन संचालनालय यांचेमार्फत या धोरणाचे समन्वय व संनियंत्रण केले जाईल.

## ४. <u>प्रशिक्षण</u>:

१. कॅरॅव्हॅन पार्क चालक / विकासक यांना वेळोवेळी शाश्वत व जबाबदार पर्यटन तसेच मार्केटिंग, स्वच्छता, व्यवस्थापन याबद्दलचे प्रशिक्षण दिले जाईल.

२. पर्यटन संचालनालय कॅरॅव्हॅन पार्क व कॅरॅव्हॅन या दोन्ही घटकांचे पर्यटन व्यवसाय प्रभावीपणे चालविण्यासाठी खालील विषयाबाबत तज्ञ व्यक्तींमार्फत प्रशिक्षणाची सोय करेल.

- जबाबदार व सुरक्षित पर्यटन
- प्रभावी व्यवस्थापन
- प्रसिद्धी व विपणन
- आरोग्यदायी व स्वच्छता

५. <u>रोजगार निर्मिती</u>

८०% स्थानिकांना अकुशल रोजगारामध्ये प्राधान्य दिले जाईल म्हणजेच कॅरॅव्हॅन व कॅरॅव्हॅन पार्कचे ऑपरेटर, मालक हे या दोन्ही ठिकाणी त्या - त्या जिल्ह्यातील रहिवाशांना रोजगारामध्ये प्राधान्य देतील.

६. **<u>प्रसिद्धी व विपणन:</u>**

१. पर्यटन संचालनालय कॅरॅव्हॅन पर्यटन प्रसिद्धी व प्रचालनाकरिता कार्य करेल.
२. मान्यताप्राप्त कॅरॅव्हॅन पार्कची प्रसिद्धी पर्यटन विभागाच्या संकेतस्थळावरुन करण्यात येईल. तसेच विविध समाज माध्यमांतून वेगवेगळ्या इव्हेंट, रोड शो, प्रदर्शने (Exhibition), प्रेस मीट, फॅम ट्रीप च्या माध्यमांतून प्रसिद्धी करण्यात येईल.
३. कॅरॅव्हॅन पर्यटनाकरिता वेगवेगळया सर्किटची निर्मिती करण्यात येईल.
४. कॅरॅव्हॅन पार्क व कॅरॅव्हॅन मालकांनी तयार केलेले व्हिडीओ यांची प्रसिद्धी केली जाईल.
५. महाराष्ट्र पर्यटनाच्या रोडशोच्या वेळी निवडक कॅरॅव्हॅन ऑपरेटर्सना संबंधित ठिकाणी नेण्यात येईल.

**<u>७. सुलभीकरण</u>:**

कॅरॅव्हॅन पर्यटनाच्या विकासासाठी खालीलप्रमाणे सुविधा सुलभीकरण (Facilitation) करण्यात येईल.

१. महाराष्ट्रात पर्यटन क्षमता असलेल्या पर्यटन स्थळी कॅरॅव्हॅन पार्क करीता शासकीय जमीन उपलब्ध करुन देणे.
२. संबंधित विभागाकडुन ना-हरकत प्रमाणपत्र/ परवानगी मिळविण्याकरिता मदत करणे.
३. कॅरॅव्हॅन वाहन नोंदणीकरिता मदत करणे.
४. कॅरॅव्हॅन पार्क गुंतवणूकदारास कॅरॅव्हॅन पार्कचा नकाशा संबंधित यंत्रणेकडुन मंजुर करुन घेण्याकरिता पर्यटन विभागाकडुन आवश्यक ती मदत करण्यात येईल.

५. कॅरॅव्हॅन पार्क / कॅरॅव्हॅन वाहनाकरिता विविध विभागाच्या परवानग्या / ना- हरकत प्रमाणपत्र करिता एक खिडकी योजना सुरू करण्यात येईल.

**८. <u>राज्यस्तरीय समिती:-</u>**

कॅरॅव्हॅन पर्यटन धोरणांतर्गत विविध बाबींवर मार्गदर्शन, पर्यवेक्षण व संनियंत्रण करण्यासाठी राज्यस्तरीय समितीची रचना खालीलप्रमाणे असेल.

१. प्रधान सचिव (पर्यटन) - अध्यक्ष
२. प्रधान सचिव (वने)
३. अपर मुख्य सचिव (जलसंपदा विभाग)
४. परिवहन आयुक्त
५. विशेष पोलिस महानिरीक्षक, महाराष्ट्र राज्य मुंबई.
६. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ, मुंबई
७. संचालक, राज्य पुरातत्व विभाग
८. कॅरॅव्हॅन पर्यटनक्षेत्रातील २ तज्ञ व्यक्ती
९. संचालक, पर्यटन संचालनालय - सदस्य सचिव.

**९. <u>समितीची कार्यकक्षा</u>**

१. कॅरॅव्हॅन पर्यटन धोरणाच्या अंमलबजावणीत येणाऱ्या अडचणी सोडविण्यासाठी वेळोवेळी बदल करणे.
२. कॅरॅव्हॅनच्या नवीन प्रकारांचा समावेश करणे.
३. हायब्रीड कॅरॅव्हॅन पार्क संदर्भात नवीन बाबींचा समावेश करण्याबाबत निर्णय घेणे.
४. कॅरॅव्हॅन पर्यटन धोरणाच्या अंमलबजावणीसाठी स्थळांचा प्राधान्यक्रम निश्चित करणे.
५. पर्यटन धोरणाच्या लाभाच्या अनुषंगाने आवश्यक ते बदल सुचविणे.
६. प्रसिद्धी व प्रचालनासाठी संचालक, पर्यटन संचालनालय यांना मार्गदर्शन करणे.
७. आवश्यकतेनुसार धोरणात बदल सुचविणे. विविध विभागांशी समन्वय साधणे.
८. सुरक्षेसंबंधी उपाय सुचविणे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२१०३१५१५३९२७७२२३ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Ramesh Jayaram Kadam

Digitally signed by Ramesh Jayaram Kadam
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=TOURISM AND CULTURAL AFFAIRS DEPARTMENT, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=931a917c29ea693ba9abee543d58bf1b6ade60ae69c9be92f59d232bb3a3fcc8, serialNumber=c8fbeb4e149e205d858dabb5d81a2a90a8deb719257572300ef79cfab47d9345, cn=Ramesh Jayaram Kadam
Date: 2021.03.17 15:54:32 +05'30'

**(र. ज. कदम)**
अवर सचिव, महाराष्ट्र शासन.

**प्रति,**

१. मा. राज्यपाल यांचे प्रधान सचिव, राजभवन, मुंबई.

२. मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई-३२.
३. मा. मंत्री(पर्यटन) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई-३२.
४. मा. राज्यमंत्री (पर्यटन) यांचे खाजगी सचिव,मंत्रालय, मुंबई-३२.
५. मा. सर्व मंत्री / राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव,मंत्रालय, मुंबई-३२.
६. मा. विरोधी पक्षनेता विधानपरिषद, विधानभवन, मुंबई.
७. मा. विरोधी पक्षनेता विधानसभा, विधानभवन, मुंबई.
८. मा. सर्व विधानपरिषद सदस्य, विधानमंडळ, मुंबई.
९. मा. सर्व विधानसभा सदस्य, विधानमंडळ, मुंबई.
१०. मा. मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.
११. अपर मुख्य सचिव, जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई.
१२. अपर मुख्य सचिव (परिवहन), गृह विभाग, मंत्रालय, मुंबई.
१३. प्रधान सचिव (वने), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई.
१४. अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव, सर्व मंत्रालयीन विभाग, मंत्रालय, मुंबई.
१५. महालेखापाल, महाराष्ट्र - १, (लेखा परीक्षा/लेखा व अनुज्ञेयता), मुंबई
१६. महालेखापाल, महाराष्ट्र - २, (लेखा परीक्षा/लेखा व अनुज्ञेयता), नागपूर
१७. महालेखापाल, (स्थानिक निकाय लेखापरीक्षा व लेखा), मुंबई.
१८. आयुक्त, परिवहन विभाग.
१९. विशेष पोलिस महानिरीक्षक, महाराष्ट्र राज्य मुंबई.
२०. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ, मुंबई.
२१. संचालक, पर्यटन संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
२२. संचालक, पुरातत्व व वस्तुसंग्रहालये संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
२३. निवड नस्ती, कार्यासन-पर्यटन.

****